# ** इतिवृत्त **

**ग्राम पंचायत विभागा अधिनस्त येणारे ग्राम सेवक (ग्राम पंचायत अधिकारी) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजने अंतर्गत पहीला / दुसरा / तिसरा लाभ देणेकरिता दिनांक १३.०८.२०२५ रोजी {बुधवार} सकाळी ११:०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अकोला यांचे कक्षात आयोजीत करण्यात आलेल्या पदोन्नती समिती सभेचे इतिवृत्त.**

ग्रामपंचायत विभाग जि.प.अकोला अधिनस्त येणारे ग्रामसेवक (ग्राम पंचायत अधिकारी) संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा पहीला/दुसरा/तिसरा लाभ देणेकरिता दिनांक **१३.०८.२०२५** रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सभेमध्ये खालील प्रमाणे मा.अधिकारी/समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्रीमती अनिता मेश्राम (भाप्रसे), मा.अध्यक्ष, कालबध्द पदोन्नती समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अकोला**
२. **श्री. दिगंबर लोखंडे मा.सचिव कालबध्द पदोन्नती समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जि.प.अकोला**
३. **श्री. दिगंबर लोखंडे मा. सदस्य,कालबध्द पदोन्नती समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(पं.) जि.प.अकोला**
४. **श्रीमती मायाताई शिर्के मा. सदस्य, कालबध्द पदोन्नती समिती तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.अकोला**
५. **श्री. तुषार जाधव मा. सदस्य, कालबध्द पदोन्नती समिती तथा समाज कल्याण अधिकारी, जि.प.अकोला**

पंचायत विभागातर्फे श्री.दिगंबर लोखंडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जि.प.अकोला यांनी उपस्थित पदोन्नती समितीचे मा.अध्यक्ष मा.समिती सदस्य अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात केली. त्यानुसार ग्राम पंचायत विभाग अधिनिस्त येणाऱ्या ग्रामसेवक(ग्राम पंचायत अधिकारी) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना शा.नि.वित्त विभाग क्र.वेतन-११०९/ प्रक्र.४४/सेवा-३ दिनांक ०१ एप्रील २०१० मधील २. (ब) (१) नुसार योजनेचा पहिल्या लाभाकरीता १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर व (क) नुसार योजनेच्या दुसऱ्या लाभा करीता २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर उक्त शा.नि.तील तरतुदीनुसार अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचाना मंजुर करण्याची तरतुद आहे. तसेच शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये दिनांक ०१.०१.२०१६ पासुन सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर तिन लाभांची सुधारीत आश्वासीत प्रगती योजना मंजुर करण्यात आल्याने त्यानुसार १०,२०,३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर ग्राम सेवक (ग्राम पंचायत अधिकारी) या संवर्गातील कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव समिती समोर विचारार्थ टेवण्यात आला. त्यानुसार ग्राम पंचायत विभागांतर्गत येणाऱ्या संवर्गाचे विविध आस्थापनेकडुन प्राप्त प्रस्तावानुसार १२ वर्ष सेवेनंतर योजनेचा प्रथम, २४ वर्ष सेवेनंतर द्वितिय लाभधारक कर्मचाऱ्यांची स्थिती व १० वर्षाचे सेवेनंतर योजनेचा पहीला लाभ व २० वर्षाचे सेवेनंतर दुसरा लाभ तसेच ३० वर्षाचे सेवे नंतर तिसरा लाभ देण्याचे समितीने टरविले.

तत्पुर्वी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि. प. अकोला यांनी सुचित केले की, ज्या कर्मचाऱ्यां विरुध्द प्रशासकिय कार्यवाही, खाते चौकशी प्रकरणे, न्यायालयीन प्रकरणे, शिक्षेचा अंमल सुरु आहे, जातवैधता प्रमाणपत्र अप्राप्त आहे, तसेच निलंबित आहेत अशा कर्मचाऱ्यांना लाभ देता येणार नाही, तसेच कालबध्द पदोन्नती प्रस्तावात कर्मचारी यांची जन्म दिनांक व सेवा निवृत्त दिनांक हयाबाबी सुध्दा नमुद करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२ दिनांक ०१.०८.२०१९ मधील मुद्दा क्र.८ नुसार कार्यमुल्य मापन अहवाल उपलब्ध होत नसल्यास करावयाची कार्यवाही अंर्तगत लगतपुर्व ५ वर्षातील किंवा एखादया वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल अप्राप्त असल्यास याबाबतची सविस्तर माहिती समितीने निर्णय घेणे आवश्यक राहील.

८.१ नुसार जर पदोन्नतीच्या क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांनी स्वतःचे कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवेदन अधिकाऱ्यास सादर केले असतील व सदर अहवालाचे प्रतिवेदन / पुर्नविलोकन नसल्याने कार्य मूल्यमापन अहवाल अप्राप्त असल्यास किंवा पुर्नविलोकन केलेले नसल्यास, संबंधित अधिकारी / कर्मचारी जबाबदार नसल्याने, त्याचे त्या वर्षीचे कार्य मूल्यमापन अहवाल किमान निकषाचे असल्याचे गृहीत धरुन त्यांना कालबध्द पदोन्नतीसाठी विचार करावा असा समितीने निर्णय घेतला आहे.

८.२ एखाद्या प्रकरणात अधिकारी / कर्मचारी यांना विभागीय चौकशीअंती निर्दोष टरविण्यात आले व निलंबन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात आला तर अशा निलंबित कालावधी मधील कार्य मुल्यमापन अहवाल लिहीलेले नसल्याने त्या कार्य मुल्यमापन अहवाल हे कालबध्द पदोन्नतीसाटीच्या किमान आवश्यक पात्रतेचे असल्याचे धरण्यात यावेत.तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३ दिनांक

०५.०७.२०१० नुसार गोपनिय अहवालाची सरासरी प्रतवारी निश्चित करण्यात येवुन त्याचा सुध्दा समावेश कालबध्द आश्वासीत प्रगती योजनेच्या प्रस्तावात समावेश करण्यात यावा. असे समितीने निदेश दिलेत. त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.१ ऑगस्ट,२०१९ मधील परिशिष्ट-४(३) मधील तरतुदीनुसार प्रथम लाभाकरीता किमान २० गुण, व्दितीय व तीसऱ्या लाभाकरीता किमान सरासरी २५ गुण आवश्यक असल्याचे समितीने निर्णय घेतला आहे.

त्यानुसार खालील विवरणपत्रात नमुद कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा पहीला / दुसरा / तिसरा लाभ देणेकरिता सादर केलेले प्रस्तावानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र, गोपनिय अहवाल इत्यादी बाबींची पडताळणी तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल पुर्नविलोकीत नाहीत, अशा कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल शासन निर्णय साप्रवि दिनांक ०१.११.२०११ मधील तरतुदीनुसार संस्करण अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्रासह व सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेसंबंधीत वेळोवेळी निर्गमित शासन निर्णय / परिपत्रके इत्यादींची पडताळणी करण्यात येवुन सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा पहीला,दुसरा व तीसरा लाभ देणेकरिता खालील प्रमाणे मा.समितीद्वारा कर्मचाऱ्यांना पात्र / अपात्र ठरविण्यात आले.

**पदनाम :- ग्रामसेवक/ग्रा.पं.अ. यांना पहीला लाभ (१० वर्षाचे सेवेनंतरचा)**

**विद्यमान वेतनश्रेणी :- S-८: २५५००-८११०० लागु करावयाची वरिष्ठ वेतनश्रेणी :- S-१२ : ३२०००-१०१६००**

**S-१४ : ३८६००-१२२८०० प्रत्यक्ष लाभ दि. २४/०९/२०२४ पासुन देय राहील**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पात्र / अपात्र | समितीचे निर्देश / शेरा | वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश गो. शिरसाठ | पात्र | - | ११/११/२०२३ |
| २ | श्री संदीप आर. गवई | अपात्र | दि. २६/०८/२०२५ पर्यंत अंमल सुरु आहे | - |
| ३ | श्री किशोरसिंग आर ठाकुर | अपात्र | संबधीतास स्थायी/मराठी भाषा सुट प्रदान नाही | - |
| ४ | गोपाल आर. टिकार | अपात्र | संबधीतास स्थायी/मराठी भाषा सुट प्रदान नाही | - |
| ५ | मनोज एम पिंपळकर | पात्र | - | १/०१/२०२० |
| ६ | लक्ष्मण बी चुडे | अपात्र | संबधीतास स्थायी प्रदान नाही | - |
| ७ | अविनाश एम थोप | अपात्र | खाते चौकशी व न्यायालयीन प्रकरण सुरु आहे | - |
| ८ | व्ही व्ही चव्हाण | अपात्र | स्थायी/खाते चौकशी प्रकरण सुरु आहे | - |
| ९ | कु वनमाला आर करवते | पात्र | - | १२/१२/२०१७ |
| १० | नंदु एन साळुंके | पात्र | - | ०१/०१/२०१६ |
| ११ | प्रशांत बा. सोळंके | पात्र | - | ०१/०१/२०१६ |
| १२ | गणेश जे जाधव | पात्र | - | ०१/०१/२०१६ |
| १३ | श्री सी एस डाबेराव | पात्र | - | ०१/०३/२०१८ |
| १४ | आर जे कोरकणे | पात्र | - | ०९/०२/२०२५ |
| १५ | संजय जे उईके | अपात्र | खाते चौकशी प्रकरण सुरु आहे | - |
| १६ | एस यु साळोकार | पात्र | - | ०५/१२/२०२३ |
| १७ | पी जी नाकट | पात्र | - | ०१/०१/२०१६ |
| १८ | सोनुताई एल डाबेराव | पात्र | - | २५/११/२०२४ |
| १९ | माया जे रायबोले | अपात्र | संबधीतास स्थायी प्रदान नाही | - |

**पदनाम :- ग्रामसेवक/ग्रा.पं.अ. यांना दुसरा लाभ (२० वर्षसेवेनंतर)**

**विद्यमान वेतनश्रेणी :- S-१२: ३२०००-१११६०० लागु करावयाची वरिष्ठ वेतनश्रेणी खालील प्रमाणे :-**

**१) S-१३: ३५४००-११२४०० प्रत्यक्ष लाभ दि. ०१/०१/२०१६ पासुन देय राहील.**

**२) S-१५: ४१८००-१३२३०० प्रत्यक्ष लाभ दि. २४/०९/२०२४ पासुन देय राहील.**

**३) S-१६: ४४९००-१४२४०० प्रत्यक्ष लाभ दि. ०१/०६/२०२५ पासुन देय राहील.**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पात्र / अपात्र | समितीचे निर्देश / शेरा | वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | एस एम काळे | पात्र | - | ०७/१२/२०२४ |
| २ | जी एन लांडे | पात्र | - | २७/१२/२०२४ |
| ३ | एस एस भराडे | पात्र | - | २०/११/२०२४ |
| ४ | श्रीमती अर्चना कथलकर | पात्र | - | २५/११/२०२४ |

ईतिवत्त

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्रीमती वैशाली कोकाटे | पात्र | - | १५/१२/२०२४ |
| ६ | श्रीम. ज्योत्सना गाडगे | पात्र | - | २५/११/२०२४ |
| ७ | देवानंद ए डोंगरे | पात्र | - | ०९/१२/२०२४ |
| ८ | अमितकुमार कुरुमकार | पात्र | - | ०३/१२/२०२४ |
| ९ | कु संगीता भगत | पात्र | - | २९/११/२०२४ |
| १० | कु सोनाली सावजी | पात्र | - | २३/१२/२०२४ |
| ११ | सुरेश पी वानखडे | पात्र | - | २३/११/२०२४ |
| १२ | शोभा बदुकले | पात्र | - | २०/१२/२०२४ |
| १३ | सुनिल वा मानकर | पात्र | - | ३१/०३/२०२५ |
| १४ | दत्तात्रय आर टिकार | पात्र | - | ०१/०१/२०१६ |

**पदनाम :- ग्रामसेवक/ग्रा.पं.अ. यांना तिसरा लाभ (३० वर्षाचे सेवेनंतरचा)**
**विद्यमान वेनश्रेणी :- S-१३ : ३५४००-११२४०० लागु करावयाची वरिष्ठ वेतनश्रेणी :- S-१५: ४१८००-१३२३००**
**S-२० : ५६१००-१७७५०० प्रत्यक्ष लाभ दि. २४/०९/२०२४ पासुन देय राहील.**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पात्र / अपात्र | समितीचे निर्देश / शेरा | वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | भक्तराज एस गावंडे | पात्र | - | २१/११/२०२० |
| २ | आर एम चव्हाण | पात्र | - | ०१/०५/२०१७ |
| ३ | जे आर सपकाळ | पात्र | - | ०१/०१/२०१६ |
| ४ | गणेश के हिवरकर | अपात्र | दि. २३/०८/२०२५ पर्यत अंमल सुरु आहे | - |
| ५ | दिलीप एस वाहोकार | पात्र | - | १७/१०/२०२२ |
| ६ | श्रीराम एस ताले | पात्र | - | १६/१०/२०२२ |
| ७ | एल एम पल्हाडे | पात्र | - | २२/०१/२०२० |
| ८ | अनंत पी मोहोकार | पात्र | - | १३/१०/२०२२ |
| ९ | आर के बोचरे | पात्र | - | ०१/०५/२०१८ |
| १० | एम जी अवातिरक | अपात्र | संबधीतास स्थायी/मराठी भाषा सुट प्रदान नाही | - |

**पदनाम :- ग्रामसेवक यांना प्रथम लाभ ***(१२ वर्षाचे सेवेनंतरचा)**
**मुळ वेतनश्रेणी:- ४०००-१००-६००० विशेष वेतन- रु. २००/- विद्यमान (४५००-१२५-७०००)**
**प्रत्यक्ष लाभ दि.०१/०४/२००८ पासुन देय**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पात्र / अपात्र | समितीचे निर्देश / शेरा | वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | अरुण आर पिंपळे | पात्र | - | ०१/०१/१९९८ |
| २ | दिगंबर बी भारसाकळे | पात्र | - | १५/०५/२००७ |
| ३ | महादेव आर भारसाकळे | पात्र | - | ०१/०७/२०१२ |
| ४ | यु डी तेलगोटे | अपात्र | ACB न्यायालय व खाते चौकशी सुरु असल्याने | - |
| ५ | आर के बिहाडे | पात्र | - | २०/११/१९९४ |
| ६ | केशव पी वाघ | पात्र | - | ०६/०९/२००९ |
| ७ | बी एस मालोकार | पात्र | - | ०५/०९/२००५ |
| ८ | आर डी अरखराव | पात्र | - | ०१/०५/२०१२ |

**पदनाम :- ग्रामसेवक यांना दुसरा लाभ (२४ वर्षाचे सेवेनंतरचा)**
**लागु करावयाची वरिष्ठ वेतनश्रेणी :- एस-१३ :- ३५४००-११२४०० प्रत्यक्ष लाभ दि. ०१/०४/२०१० पासुन देय**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पात्र / अपात्र | समितीचे निर्देश / शेरा | वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | एस एस गायकवाड | पात्र | - | २२/१०/२०१० |
| २ | एम के हिरळकर | पात्र | - | २२/१०/२०११ |
| ३ | बी एन कोहर | पात्र | - | ०१/१०/२००६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | आर के बोचरे | पात्र | " | ०१/०५/२०१२ |
| ५ | डी डी काळे | पात्र | " | २३/०७/२०१४ |
| ६ | आर के बिहाडे | पात्र | " | ०१/१०/२००६ |

वरील प्रपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे मा.समिती व्दारा पात्र/अपात्रेबाबत निर्णय घेण्यात आला व समितीने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येईल असे आश्वासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी समितीस दिले व आजची समिती सभा कार्यवाही पुर्ण झाल्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.अकोला पदोन्नती निवड समितीचे आभार मानुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संमतीने सभा संपल्याचे घोषित केले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद,अकोला

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं)
जिल्हा परिषद,अकोला

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अकोला

पंचायत विभाग जि. प. अकोला येथील ग्रामपंचायत अधिकारी यांना आ.प्र. योजनाचा लाभ देणेबाबतची सभा दिनांक 13/08/2025 रोजी पार पाडण्यात आली आहे. सभेचे इतिवृत्त वेबसाईड वर प्रसिध्द करण्यात येत असुन सदरच्या इतिवृत्तानुसार कर्मचाऱ्यांचे आक्षेप असल्यास 7 दिवसांच्या आंत ग. वि.अ. पंचायत समिती मार्फत या कार्यालयाकडे सादर करावे. विहीत मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अंतिम निर्णय घेण्यात येईल.

मा. मु.का.अ. यांचे आदेशानुसार